**L. A. BILL No. LXVI OF 2025.**

A BILL

TO PROVIDE FOR ESTABLISHMENT OF THE NASHIK-TRIMBAKESHWAR KUMBH MELA AUTHORITY FOR THE ORGANIZATION AND MANAGEMENT OF KUMBH MELA AND ALLIED ACTIVITIES IN NASHIK AND TRIMBAKESHWAR TALUKAS AND OTHER AREAS IN NASHIK DIVISION AT THE INTERVAL OF EVERY TWELVE YEARS AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६६.**

**नाशिक व त्र्यंबकेश्वर तालुक्यांमध्ये आणि नाशिक विभागातील इतर क्षेत्रांमध्ये दर बारा वर्षांच्या कालांतराने होणारा कुंभमेळा व संलग्न उपक्रमांचे आयोजन व व्यवस्थापन करण्यासाठी नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण स्थापन करण्याकरिता आणि तत्संबंधित व तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २ जुलै, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

एचबी ०६८७–१

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, नाशिक व त्र्यंबकेश्वर तालुक्यांमध्ये आणि नाशिक विभागातील इतर क्षेत्रांमध्ये दर बारा वर्षांच्या कालांतराने होणारा कुंभमेळा व संलग्न उपक्रमांचे आयोजन व व्यवस्थापन करण्यासाठी नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण स्थापन करण्याकरिता आणि तत्संबंधित व तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक ४ जून २०२५ रोजी नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण अध्यादेश, २०२५, हा प्रख्यापित केला होता;

२०२५ चा महा. अध्या. ५.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे त्यात विवक्षित गौण फेरबदल करून राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण अधिनियम, २०२५, असे म्हणावे.

(२) तो, नाशिक व त्र्यंबकेश्वर तालुक्यांमधील क्षेत्रांना आणि राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा, नाशिक विभागातील अन्य क्षेत्रास किंवा क्षेत्रांना जेथे कुंभमेळ्याशी संबंधित असणारे उपक्रम व संलग्न उपक्रम आयोजित केले जातात तेथे लागू होईल.

(३) तो, दिनांक ४ जून २०२५ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

व्याख्या.

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,-

(क) "संलग्न उपक्रम" याचा अर्थ, भाविक, प्रवासी, पर्यटक व नाशिक विभागातील किंवा विभागात येणाऱ्या इतर व्यक्ती यांना अध्यात्मिक, धार्मिक, प्रवास किंवा पर्यटन यांविषयीची अनुभूती उन्नत करण्याच्या दृष्टीने, कुंभमेळ्याचे आयोजन करण्यापूर्वी, आयोजन करताना किंवा आयोजनानंतर हाती घेतलेले सर्व उपक्रम,असा आहे;

(ख) "प्राधिकरण" याचा अर्थ,अधिनियमाच्या कलम ४ अन्वये स्थापन केलेले नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण, असा आहे;

(ग) "अध्यक्ष" याचा अर्थ, प्राधिकरणाचा अध्यक्ष, असा आहे ;

(घ) "आयुक्त" याचा अर्थ, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ याच्या कलम ६ अन्वये नियुक्त केलेला नाशिक विभागाचा आयुक्त किंवा राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियुक्त करील असा अधिकारी, असा आहे ;

१९६६ चा महा. ४१.

(ङ) "कुंभमेळा मंत्री समिती" किंवा "मंत्री समिती" याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम ३ अन्वये शासनाने घटित केलेली कुंभमेळा मंत्री समिती, असा आहे ;

(च) "जिल्हा" याचा अर्थ, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ याच्या कलम ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे आणि कलम ४ नुसार अधिसूचित केल्याप्रमाणे जिल्हा, असा आहे ;

१९६६ चा महा. ४१.

(छ) "विभाग" याचा अर्थ, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ याच्या कलम ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे एक किंवा अधिक जिल्हयांचा समावेश असलेला विभाग, असा आहे ;

१९६६ चा महा. ४१.

(ज) "शासन" किंवा "राज्य शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे;

(झ) "कुंभमेळा" याचा अर्थ, नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे सुमारे दर बारा वर्षांच्या कालांतराने आयोजित केलेला धार्मिक मेळा, असा आहे;

(ञ) "कुंभमेळा क्षेत्र" यामध्ये, नाशिक व त्र्यंबकेश्वर तालुक्यांच्या क्षेत्रांचा आणि जेथे कुंभमेळ्याशी संबंधित असणारे उपक्रम व संलग्न उपक्रम आयोजित केले जातात अशा, नाशिक विभागातील अन्य क्षेत्राचा किंवा क्षेत्रांचा समावेश होतो ;

(ट) “कुंभमेळा आयुक्त” याचा अर्थ, कुंभमेळ्याशी संबंधित असणारे उपक्रम व संलग्न उपक्रम यांचे व्यवस्थापन करण्यासाठी राज्य शासनाने नियुक्त केलेला भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी, असा आहे ;

(ठ) “कुंभमेळा निधी” याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम १५ अन्वये स्थापन केलेला निधी, असा आहे ;

(ड) “कुंभमेळा योजना” यामध्ये, कुंभमेळा व संलग्न उपक्रम यांचे व्यवस्थापन करण्यासाठी आवश्यक असलेली सर्व कामे, प्रकल्प, बांधकामे व प्रापण यांचा समावेश होतो ;

(ढ) “स्थानिक प्राधिकरण” याचा अर्थ, महानगरपालिका, नगरपरिषद, नगर पंचायत, औद्योगिक नगरी, नियोजन प्राधिकरण, जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत आणि कायद्याद्वारे घटित केलेल्या अन्य स्थानिक स्वराज्य संस्था, असा आहे ;

(ण) “विहित” याचा अर्थ, अधिनियमान्वये राज्य शासनाने केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(त) “विनियम” याचा अर्थ, अधिनियमान्वये केलेले विनियम, असा आहे ;

(थ) “धर्मसभा” याचा अर्थ, धार्मिक विधी करण्यासाठी पुरुष, स्त्रिया व मुले यांचा एक लहान किंवा मोठा मेळावा, असा आहे;

(ध) “नियम” याचा अर्थ, राज्य शासनाद्वारे केलेले नियम, असा आहे.

मंत्री समिती.

**३.** (१) राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, कुंभमेळा मंत्री समिती घटित करील.

(२) शासन, समितीच्या एका मंत्र्यास “कुंभमेळा मंत्री” म्हणून नियुक्त करील.

(३) राज्य शासन, उपजिल्हाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याची, समितीचा सचिव म्हणून नियुक्ती करील.

(४) मंत्री समिती,-

(एक) प्राधिकरण, अध्यक्ष व कुंभमेळा यांच्या कामाचा वेळोवेळी आढावा घेईल ;

(दोन) प्राधिकरणाने सादर केलेल्या अहवालाची तपासणी करील;

(तीन) अधिनियमाच्या कलम १२ अन्वये प्राधिकरणाद्वारे लादण्यात यावयाच्या शुल्कास मान्यता देईल.

प्राधिकरणाची स्थापना.

**४.** (१) राज्य शासन, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, शक्य तितक्या लवकर, या अधिनियमान्वये त्यास प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि नेमून दिलेली कार्ये पार पाडण्यासाठी, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण स्थापन करू शकेल.

(२) प्राधिकरण हे, अखंड परंपरा व सामायिक मोहोर असलेले, तसेच जंगम व स्थावर अशा दोन्हीही मालमत्ता संपादित करण्याचा, धारण करण्याचा व तिची विल्हेवाट लावण्याचा आणि करार करण्याचा अधिकार असलेले, एक निगम निकाय असेल आणि त्यास किंवा त्याच्याविरुद्ध उक्त नावाने दावा दाखल करता येईल.

(३) प्राधिकरणाचे मुख्यालय, नाशिक येथे असेल.

प्राधिकरणाची रचना.

**५.** प्राधिकरण पुढील सदस्यांचे मिळून बनलेले असेलः-

| | | |
|---|---|---|
| (एक) | आयुक्त, नाशिक विभाग | अध्यक्ष ; |
| (दोन) | जिल्हाधिकारी, नाशिक जिल्हा | उपाध्यक्ष; |
| (तीन) | विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र | उपाध्यक्ष; |

(चार) जिल्हाधिकारी, अहिल्यानगर जिल्हा — पदसिद्ध सदस्य;

(पाच ) महानगर आयुक्त, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण — पदसिद्ध सदस्य;

(सहा) पोलीस आयुक्त, नाशिक शहर — पदसिद्ध सदस्य;

(सात) पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण — पदसिद्ध सदस्य;

(आठ) महानगरपालिका आयुक्त, नाशिक शहर महानगरपालिका — पदसिद्ध सदस्य;

(नऊ) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक — पदसिद्ध सदस्य;

(दहा ) मुख्याधिकारी, त्र्यंबकेश्वर नगरपरिषद, त्र्यंबकेश्वर — पदसिद्ध सदस्य;

(अकरा) उपायुक्त, नियोजन, नाशिक — पदसिद्ध सदस्यः

(बारा) विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य रस्ते परिवहन महामंडळ, नाशिक — पदसिद्ध सदस्य;

(तेरा) आरोग्य उपसंचालक, नाशिक — पदसिद्ध सदस्य;

(चौदा) अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग (गोदावरी नदी व जल व्यवस्थापनाचा प्रभारी), नाशिक — पदसिद्ध सदस्य;

(पंधरा) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक — पदसिद्ध सदस्य;

(सोळा) मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,नाशिक — पदसिद्ध सदस्य;

(सतरा) अधीक्षक अभियंता,महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, नाशिक — पदसिद्ध सदस्य;

(अठरा) प्रादेशिक अधिकारी,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक — पदसिद्ध सदस्य;

(एकोणवीस) सहसंचालक, लेखा व कोषागारे, नाशिक — पदसिद्ध सदस्य;

(वीस) सहसंचालक, नगररचना, नाशिक विभाग — पदसिद्ध सदस्य;

(एकवीस) रेल्वे मंडळाने नामनिर्देशित केलेला प्रतिनिधी — पदसिद्ध सदस्य;

(बावीस) कुंभमेळा आयुक्त — सदस्य-सचिव.

**प्राधिकरणाची बैठक.**

६. (१) प्राधिकरण, दर तीन महिन्यांतून किमान एकदा बैठक घेईल.

(२) प्राधिकरणाच्या बैठकींच्या अध्यक्षस्थानी, अध्यक्ष असेल.

(३) बैठकीचे ठिकाण, वेळ व पद्धती अध्यक्षाद्वारे ठरविण्यात येईल अशी असेल.

(४) बैठकीची गणपूर्ती, प्राधिकरणाच्या सदस्यांपैकी किमान एक तृतीयांश सदस्य मिळून होईलः

परंतु, जर गणपूर्तीच्या अभावी कोणतीही बैठक घेता येऊ शकली नाही तर, अध्यक्ष, मूळ नियोजित बैठकीच्या चोवीस तासांपेक्षा अगोदर नसेल अशा वेळी, बैठकीचे ठिकाण, वेळ व पद्धती ठरवील, आणि अशा बैठकीसाठी कोणतीही गणपूर्ती अनिवार्य असणार नाही.

(५) प्राधिकरणास, कोणत्याही बाबीवर किंवा बाबींवर सहाय्य करण्याच्या किंवा सल्ला देण्याच्या प्रयोजनासाठी विशेष निमंत्रित म्हणून त्याच्या बैठकीला किंवा बैठकींना उपस्थित राहण्याकरिता कोणत्याही अतिरिक्त व्यक्तींना निमंत्रित करता येईल. अशा विशेष निमंत्रित व्यक्तीस, प्राधिकरणाच्या कामकाजात भाग घेता येईल, परंतु, त्यास मतदान करण्याचा हक्क असणार नाही.

(६) प्राधिकरण, त्याच्याकडून ठरविण्यात येईल अशा, बैठक घेण्यासाठीच्या कार्यपद्धतीच्या नियमांचे पालन करील.

प्राधिकरणाचे अधिकार व कार्ये.

**७.** (१) कुंभमेळ्याचे व संलग्न उपक्रमांचे प्रभावीपणे आयोजन व व्यवस्थापन करण्याच्या दृष्टीने, प्राधिकरण, पुढील अधिकारांचा वापर करील आणि पुढील कार्ये पार पाडील:-

(क) मंत्री समितीच्या सल्ल्याने कुंभमेळा योजना तयार करणे आणि ती मान्यतेसाठी, राज्य शासनाला सादर करणे;

(ख) कुंभमेळा व संलग्न उपक्रमांचे आयोजन व व्यवस्थापन करण्यासाठी नियोजन, समन्वय व अंमलबजावणी प्राधिकरण म्हणून कार्य करणे;

(ग) कुंभमेळा योजनेअंतर्गत प्रस्तावित केलेल्या बांधकामांना प्रशासकीय मान्यता देणे;

(घ) निविदेच्या नोटिसा तयार करणे व त्या निर्गमित करणे, बोलींचे मूल्यमापन करणे, कंत्राटे देणे आणि निवडलेल्या बोलीदाराने कंत्राटाच्या दायित्वांचे अनुपालन केल्याचे संनियंत्रण करणे यांचे पर्यवेक्षण करण्याचा समावेश असलेल्या, परंतु यापुरते मर्यादित नसलेल्या, बांधकामे, प्रापण व सेवा यांकरिता शासकीय विभागांच्या, स्थानिक प्राधिकरणांच्या, शासकीय कंपन्या, सांविधिक मंडळे व महामंडळांच्या निविदा प्रक्रियेचे पर्यवेक्षण करणे ;

(ङ) अधिनियमाच्या कलम १२ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनासाठी शुल्क लादणे;

(च) कुंभमेळा व संलग्न उपक्रम संपल्यानंतर, कुंभमेळ्यादरम्यान बांधलेल्या किंवा प्रापण केलेल्या विविध मत्तांच्या पुढील वापराबाबत निर्णय घेणे;

(छ) राज्य शासनाकडून वेळोवेळी प्रदान करण्यात येतील, निदेशित करण्यात येतील किंवा सोपविण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करणे आणि कार्ये पार पाडणे.

(२) पोट-कलम (१) मध्ये नमूद केलेले अधिकार व कार्ये ही, कुंभमेळ्याचे व संलग्न उपक्रमांचे आयोजन व व्यवस्थापन करण्याशी प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे संबंधित असलेल्या प्रक्रिया, कामे, प्रकल्प, बांधकामे किंवा प्रापण यांच्या प्रयोजनांसाठीच केवळ वापरण्यात येतील व करता येतील आणि इतर कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात येणार नाहीत व करण्यात येणार नाहीत.

(३) पोट-कलम (१) अन्वये प्राधिकरणाने केलेली कोणतीही कारवाई ही, कुंभमेळ्याच्या किंवा संलग्न उपक्रमांच्या आयोजनाचा किंवा व्यवस्थापनाचा भाग आहे किंवा नाही यासंबंधी विवाद निर्माण झाल्यास, त्यावरील राज्य शासनाचा निर्णय अंतिम असेल.

(४) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये प्राधिकरणाने कोणत्याही व्यक्तीला, अधिकाऱ्याला किंवा संघटनेला दिलेले आदेश, मान्यता, सूचना व निदेश, बंधनकारक व अंतिम असतील.

(५) प्राधिकरण, केलेल्या कामाचा अहवाल, प्रत्येक महिन्याला मंत्री समितीला व राज्य शासनाला सादर करील.

अध्यक्षाचे अधिकार व कार्ये.

**८.** (१) कुंभमेळा व संलग्न उपक्रमांचे प्रभावीपणे आयोजन व व्यवस्थापन करण्याच्या दृष्टीने, अध्यक्ष, पुढील अधिकारांचा वापर करील आणि पुढील कार्ये पार पाडील:-

(क) (एक) कोणत्याही पायाभूत सुविधा उभारणे आणि सेवा प्रदान करणे यांसह कुंभमेळ्याचे व संलग्न उपक्रमांचे आयोजन व व्यवस्थापन करण्यासाठी;

(दोन) वाहतूक, परिवहन व गर्दीचे व्यवस्थापन करण्याच्या प्रयोजनासाठी;

(तीन) नाशिक विभागाच्या सीमेतील कोणताही शासकीय विभाग, अभिकरण व प्राधिकरण कोणत्याही स्थानिक प्राधिकरणासह, शासकीय कंपनी, सांविधिक मंडळ किंवा महामंडळ यांच्याकडे उपलब्ध असलेल्या मानवी, भौतिक व वित्तीय संसाधनांसह, अन्य संसाधने पुरविण्यासाठी व त्यांचा वापर करण्यासाठी;

(चार) शासनाच्या मान्यतेने, नाशिक विभागाच्या सीमेबाहेरील, परंतु, महाराष्ट्र राज्याच्या सीमेतील कोणताही शासकीय विभाग, अभिकरण व प्राधिकरण कोणत्याही स्थानिक प्राधिकरणासह, शासकीय कंपनी,सांविधिक मंडळ किंवा महामंडळ यांच्याकडे उपलब्ध असलेल्या मानवी, भौतिक व वित्तीय संसाधनांसह, अन्य संसाधने पुरविण्यासाठी व त्यांचा वापर करण्यासाठी,

नाशिक विभागाच्या सीमेतील स्थानिक प्राधिकरणे, शासकीय कंपन्या, सांविधिक मंडळे किंवा महामंडळे किंवा सार्वजनिक विश्वस्त संस्था यांसह विविध शासकीय विभाग, अभिकरणे, प्राधिकरणे स्थानिक प्राधिकरणांसह यांच्या अधिकारी व कर्मचारी यांना आवश्यक असतील असे निदेश देणे आणि त्यांच्या पदीय कर्तव्याचा भाग म्हणून दिलेल्या निदेशांचे अनुपालन करणे हे, स्थानिक प्राधिकरण, शासकीय कंपनी, सांविधिक मंडळ किंवा महामंडळ किंवा सार्वजनिक विश्वस्त संस्था यांसह संबंधित शासकीय विभाग, अभिकरण, प्राधिकरण आणि अधिकारी व कर्मचारी यांचे कर्तव्ये असेलः

परंतु, असे कर्तव्य पार पाडण्यासाठी संबंधित विभाग, अभिकरण, प्राधिकरण, स्थानिक प्राधिकरणासह,शासकीय कंपनी,सांविधिक मंडळ किंवा महामंडळ किंवा सार्वजनिक विश्वस्त संस्था कोणतेही शुल्क आकारणार नाही;

(ख) महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही व्यक्तीच्या किंवा वाहनाच्या अथवा जलयानाच्या हालचालीचे, वाहतुकीचे व परिवहनाचे नियंत्रण व नियमन करणे;

(ग) नाशिक विभागाच्या सीमेतील कोणताही शासकीय विभाग, अभिकरण, प्राधिकरण स्थानिक प्राधिकरणासह,शासकीय कंपनी,सांविधिक मंडळ किंवा महामंडळ किंवा सार्वजनिक विश्वस्त संस्था यांच्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या किंवा कर्मचारीवर्गाच्या सेवा, पूर्णतः किंवा अंशतः अधिग्रहित करणे;

(घ) सल्ला देण्यासाठी व सहाय्य करण्यासाठी संबंधित क्षेत्रातील तज्ञ व सल्लागार किंवा कंपन्या यांना गुंतविणे किंवा नियुक्त करणे;

(ङ) स्थानिक प्राधिकरण आणि खाजगी व्यक्ती व कंपनी यांसह कोणताही शासकीय विभाग, अभिकरण, शासकीय कंपनी, सांविधिक मंडळ किंवा महामंडळ प्राधिकरण स्थानिक प्राधिकरणासह यांच्याकडून सुखसुविधांचा अनन्य किंवा अधिमान्य वापर करण्याकरिता प्राप्त करून घेणे;

(च) आवश्यक असतील अशा सेवा, सुविधा, संसाधने, जागा किंवा वाहने अधिग्रहित करणे;

(छ) प्राधिकरण ठरवील अशा पायाभूत सुविधा पुरवण्यासाठी व निर्माण करण्यासाठी अशा जमिनीचा भाडेपट्टा करण्यासाठी किंवा त्या अधिग्रहित करण्यासाठी अथवा संपादन करण्यासाठी करार करणे;

(ज) आवश्यक असतील अशा नागरी व इतर सुखसुविधा, उपयुक्त सेवा व सेवा प्रदान करणे;

(झ) या अधिनियमाच्या तरतुदींचे कोणतेही उल्लंघन केल्याबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध दिवाणी किंवा फौजदारी कार्यवाही सुरू करणे;

(ञ) राज्य शासनाने मान्यता दिलेल्या कुंभमेळा योजनेअंतर्गत हाती घ्यावयाच्या विविध बांधकामांसाठी आणि कुंभमेळ्याशी व संलग्न उपक्रमांशी प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे संबंधित असलेल्या इतर बांधकामांसाठी अंमलबजावणी अभिकरण ठरविणे किंवा कोणत्याही वेळी ते बदलणे, जे कोणताही विभाग, स्थानिक प्राधिकरण, शासकीय कंपन्या, संविधिक मंडळे किंवा महामंडळे किंवा सार्वजनिक विश्वस्त संस्था किंवा स्वतः प्राधिकरण असू शकेल अथवा अंमलबजावणीचा प्रभारी अधिकारी ठरविणे किंवा कोणत्याही वेळी ते बदलणे;

(ट) प्रकल्पाचा टप्पा, गती व गुणवत्ता यांस अधीन राहून, अंमलबजावणी अभिकरणाला, वेळोवेळी, निधी देणे किंवा अनुदान वितरित करणे आणि त्याच्या विशिष्ट पद्धती ठरविणे;

(ठ) गुणवत्ता व कालमर्यादेचे पालन करण्याची सुनिश्चिती करण्यासाठी विविध बांधकामे, प्रकल्प व प्रापणे यांसाठीच्या बोली, निविदा, कंत्राटे व करारनामे यांच्या अटी व शर्ती ठरविणे;

(ड) कंत्राटदार, विक्रेते व इतर यांच्यावर करारानुसार किंवा कंत्राटानुसार शास्ती लादण्यासाठी विभाग, स्थानिक प्राधिकरणे, शासकीय कंपन्या, सांविधिक मंडळे किंवा महामंडळे किंवा सार्वजनिक विश्वस्त संस्था किंवा कोणताही संबंधित अधिकारी यांना निदेश देणे आणि विविध बांधकामे, प्रकल्प किंवा प्रापण प्रक्रियांची अंमलबजावणी करताना आवश्यक असेल अशी अन्य कारवाई करणे;

(ढ) कुंभमेळ्याशी किंवा संलग्न उपक्रमांशी प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे संबंधित असलेल्या विविध प्रकल्पांचे, बांधकामांचे व प्रापणांचे गुणवत्ता नियंत्रण करणे किंवा करून घेणे;

(ण) कुंभमेळ्याच्या किंवा संलग्न उपक्रमांच्या व्यवस्थापनाशी प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे संबंधित असलेल्या कोणत्याही बाबींसंबंधी कोणत्याही शासकीय विभागाकडून, स्थानिक प्राधिकरणाकडून व शासकीय कंपन्या, सांविधिक मंडळे किंवा महामंडळे किंवा सार्वजनिक विश्वस्त संस्थांकडून कोणताही अहवाल व दस्तऐवज मागविणे;

(त) कुंभमेळ्याशी किंवा संलग्न उपक्रमांशी प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे संबंधित असलेल्या विविध कामांच्या, प्रकल्पांच्या, बांधकामांच्या व प्रापणाच्या व्यवस्थापनाचे पर्यवेक्षण व नियंत्रण करणे;

(थ) शासनाकडून किंवा प्राधिकरणाकडून, वेळोवेळी, प्रदान करण्यात येतील, निर्देशित करण्यात येतील किंवा सोपविण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करणे.

(२) पोट-कलम (१) मध्ये नमूद केलेले अधिकार व कार्ये यांचा वापर, कुंभमेळ्याचे व संलग्न उपक्रमांचे प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे आयोजन व व्यवस्थापन करण्याशी संबंधित असलेल्या प्रक्रियांच्या, कामांच्या, प्रकल्पांच्या, बांधकामांच्या व प्रापणांच्या केवळ प्रयोजनांसाठी करण्यात येईल,आणि, इतर कोणत्याही प्रयोजनांसाठी करण्यात येणार नाही.

(३) पोट-कलम (१) अन्वये अध्यक्षाने हाती घेतलेली कोणतीही कारवाई ही, कुंभमेळ्याच्या व संलग्न उपक्रमांच्या आयोजनाचा किंवा व्यवस्थापनाचा भाग आहे किंवा नाही यासंबंधी कोणताही विवाद असल्यास, त्यावरील राज्य शासनाचा निर्णय अंतिम असेल.

(४) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये अध्यक्षाने कोणत्याही व्यक्तीला, अधिकाऱ्याला किंवा संघटनेला दिलेले आदेश, मान्यता, सूचना व निर्देश बंधनकारक व अंतिम असतील.

(५) अध्यक्ष, दरमहा केलेल्या कामाचा अहवाल, प्राधिकरणास, मंत्री समितीस व राज्य शासनास सादर करील.

प्राधिकरणाचे अधिकारी व कर्मचारी.

**९.** (१) प्राधिकरणास, त्याचे कार्यालय व दैनंदिन कामकाज चालविण्यासाठी, ते ठरवील असे कायमस्वरूपी व तात्पुरते अधिकारी व कर्मचारी असतील.

(२) प्राधिकरण, राज्य शासनाच्या मान्यतेने, प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांसाठी व कर्मचाऱ्यांसाठी कायमस्वरूपी व तात्पुरत्या पदांची निर्मिती करील.

(३) प्राधिकरणाची कायमस्वरूपी पदे, सेवाप्रवेशाने किंवा प्रतिनियुक्तीने आणि तात्पुरती पदे, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ स्मार्ट गव्हर्नन्स किंवा इतर कोणतेही नामिकाप्रविष्ट अभिकरण यांसह एखाद्या सेवा पुरवठादार एजन्सीमार्फत भरण्यात येतील.

(४) पोट-कलम (१) अन्वये नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते यांसह सेवेच्या अटी व शर्ती, राज्य शासनाच्या मान्यतेने अंतिम करण्यात येतील.

(५) अधिकारी आणि कर्मचारी हे, अध्यक्षाच्या प्रशासकीय व शिस्तविषयक नियंत्रणाखाली असतील.

(६) कुंभमेळ्याच्या व संलग्न उपक्रमांच्या प्रभावी व्यवस्थापनाच्या प्रयोजनासाठी, पुढील अधिकारी व कर्मचारी हे, कुंभमेळा आयुक्ताच्या, प्रत्यक्ष अधीक्षणाखाली व नियंत्रणाखाली असतील:-

(क) ज्यांना निर्देश देण्यात आले आहेत आणि ज्यांच्या सेवा, अधिनियमाच्या तरतुदींनुसार अधिग्रहित करण्यात आल्या आहेत असे अधिकारी आणि कर्मचारी;

(ख) जे, कुंभमेळ्याचे व संलग्न उपक्रमांचे आयोजन व व्यवस्थापन करण्याशी प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे संबंधित आहेत असे, राज्य शासनाचे आणि राज्य शासनाच्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष नियंत्रणाखालील स्थानिक प्राधिकरणे, शासकीय कंपन्या, सांविधिक मंडळे किंवा महामंडळे किंवा सार्वजनिक विश्वस्त संस्थांचे अधिकारी व कर्मचारी.

(७) पोट-कलम (६) अन्वये विनिर्दिष्ट केलेले अधिकारी व कर्मचारी हे, अध्यक्षाच्या प्रशासकीय व शिस्तविषयक नियंत्रणाखाली असतील. अध्यक्षास, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९, किंवा यथास्थिति, लागू असलेले इतर कोणतेही सेवा नियम याअन्वये निलंबन करण्यासाठी व किरकोळ शिक्षा लादण्यासाठी नियुक्ती व शिस्तविषयक प्राधिकाऱ्याचे अधिकार असतील.

आकस्मिक प्रापण, बांधकाम व लेखांकन.

**१०.** (१) जेव्हा कोणत्याही धोकादायक आकस्मिक परिस्थितीच्या किंवा आपत्तीच्या कारणाने, अशा परिस्थितीस किंवा आपत्तीस प्रतिबंध करण्यासाठी किंवा ती सौम्य करण्यासाठी रसद पुरवठा किंवा साहित्य यांचे त्वरित प्रापण करणे, संसाधनांचे त्वरित उपयोजन करणे किंवा बांधकाम करणे आवश्यक आहे अशी प्राधिकरणाची खात्री पटली असेल त्या बाबतीत, -

(एक) ते, कोणत्याही व्यक्तीकडून किंवा कंपनीकडून आकस्मिक प्रापण करण्यासाठी किंवा बांधकाम करण्यासाठी संबंधित विभागास, अभिकरणास किंवा प्राधिकरणास स्थानिक प्राधिकरणासह, शासकीय कंपनीस, सांविधिक मंडळास किंवा महामंडळास प्राधिकृत करील आणि अशा प्रकरणी, निविदा किंवा दरपत्रके मागविण्याबाबत इतर कोणत्याही कायद्याद्वारे, नियमाद्वारे, मार्गदर्शक तत्त्वांद्वारे किंवा अन्यथा विहित करण्यात येईल अशा मानक प्रक्रियेत सूट देईल;

(दोन) प्राधिकरणाने प्राधिकृत केलेल्या नियंत्रक अधिकाऱ्याद्वारे रसद पुरवठ्याचे किंवा साहित्याचा वापर किंवा बांधकाम केल्याबाबतचे प्रमाणपत्र हे, अशा आकस्मिक प्रापणाचे किंवा बांधकामाचे लेखांकन करण्याच्या प्रयोजनासाठी वैध दस्तऐवज किंवा प्रमाणक असल्याचे मानण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये निर्णय घेण्याच्या प्रयोजनासाठी, बैठकीसाठी नोटीस देण्याचा कालावधी व गणसंख्या यांसाठीच्या आवश्यक्तांमधून सूट देण्यात येईल.

नुकसानभरपाई प्रदान करणे.

**११.** (१) जेव्हा कोणत्याही व्यक्तीच्या किंवा कंपनीच्या सेवांचा, संसाधनांचा, जागांचा किंवा वाहनांचा वापर किंवा उपयोग केला जातो तेव्हा, प्राधिकरण, पुढिल बाबी विचारात घेतल्यानंतर, प्राधिकरणाकडून निर्धारित करण्यात येईल अशी रक्कम, अशा व्यक्तीस किंवा कंपनीस प्रदान करील:-

(क) अशा सेवांच्या, संसाधनांच्या, जागांच्या किंवा वाहनांच्या प्रचलित बाजारभावानुसार प्रदेय असलेले वाजवी भाडे, नुकसान भरपाई, सेवा आकार किंवा शुल्क;

(ख) जर जागा अधिग्रहित केल्याच्या परिणामी, हितसंबंधित व्यक्तीला किंवा कंपनीला त्याचे किंवा तिचे निवासस्थान किंवा व्यवसायाचे ठिकाण बदलणे भाग पडले असेल तर, अशा बदलाशी अनुषंगिक असलेला वाजवी खर्च (कोणताही असल्यास).

(२) जर अशा रीतीने निर्धारित केलेल्या नुकसान भरपाईच्या रकमेने कोणतीही व्यक्ती किंवा कंपनी व्यथित झाली असेल तर, ती व्यक्ती किंवा ती कंपनी, अशी रक्कम कळविण्यात आल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत, लवाद व समेट अधिनियम, १९९६ याच्या तरतुदींनुसार, प्रकरण लवादाकडे निर्णयार्थ सोपविण्यासाठी मंत्री समितीच्या सचिवाकडे अर्ज करू शकेल. लवादाने निर्धारित केलेली नुकसानभरपाईची रक्कम, अशा व्यक्तीस किंवा कंपनीस प्रदान करण्यात येईल.

१९९६ चा २६.

शुल्क लादण्याचा अधिकार.

**१२.** प्राधिकरणास, विनियमांद्वारे आणि मंत्री समितीच्या मान्यतेने, कुंभमेळा क्षेत्रांतर्गत,-

(एक) कुंभमेळा क्षेत्रामधील वाहनतळावर किंवा कोणत्याही वाहनाच्या प्रवेशावर किंवा विक्रीसाठी किंवा प्रदर्शनासाठी किंवा जाहिरातीसाठी आणलेल्या मालावर शुल्क ;

(दोन) उद्योग, व्यापार किंवा व्यवसाय यांच्या नोंदणीवर शुल्क;

(तीन) सेवा आकार म्हणून व्यक्तींना पुरविलेल्या सेवांवर शुल्क;

(चार) कुंभमेळ्याच्या हिताच्या दृष्टीने, प्राधिकरणास योग्य व आवश्यक वाटतील असे कुंभमेळा क्षेत्रामधील इतर कोणतेही आकार व शुल्क, लादता येईल.

परवानगी देण्याचा अधिकार.

**१३.** प्राधिकरणास, शुल्क प्रदान केल्यावर आणि ते लादील अशा शर्तींना अधीन राहून, कुंभमेळा क्षेत्रात कोणताही व्यवसाय, उद्योग किंवा व्यापार करण्यासाठी कोणत्याही व्यक्तीला किंवा कंपनीला परवानगी देता येईल.

१९६६ चा महा. ३७.

नवीन तात्पुरते अभिन्यास, शहरे, नगरे, इत्यादींच्या मान्यतेसाठीचा अधिकार.

**१४.** (१) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६, आणि त्याखाली केलेली कोणतीही योजना, परियोजना आणि केलेले नियम व विनियम, किंवा अंमलात असलेला इतर कोणताही कायदा, नियम किंवा विनियम यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्राधिकरण, कुंभमेळा किंवा संलग्न उपक्रमांसाठी येणाऱ्या नागरिकांना व पर्यटकांना राहण्यासाठी, पर्यटनासाठी किंवा मनोरंजनासाठी कोणत्याही नवीन तात्पुरत्या शहरांच्या किंवा नगरांच्या अभिन्यासासह कोणत्याही विकासाकरिता परवानगी देण्यास सक्षम असेल. प्राधिकरणाला, अशा शहरांमध्ये किंवा नगरांमध्ये किंवा त्या सभोवताली जे आवश्यक असतील असे तंबू व राहुट्या, रस्ते आणि सुखसुविधा यांसह कोणत्याही साहित्याच्या इमारतींसह अशा संरचना बांधण्यास परवानगी देण्याचा अधिकार देखील असेल. या कलमान्वये ज्या कालावधीसाठी अशी परवानगी देण्यात येते त्या कालावधीदरम्यान, प्रारूप किंवा अंतिम विकास योजना, प्रारूप किंवा अंतिम प्रादेशिक योजना अथवा प्रारूप किंवा प्राथमिक किंवा अंतिम नगररचना परियोजना यांसह कोणत्याही योजना किंवा परियोजना, कोणत्याही कायद्यान्वये केलेले किंवा काढलेले नियम, उपविधी, विनियम, अधिसूचना किंवा आदेश यांच्या तरतुदी, नाशिक व त्र्यंबकेश्वर तालुक्यांच्या क्षेत्रामध्ये आणि या अधिनियमाच्या कलम १ च्या पोट-कलम (२) अन्वये, राज्य शासनाद्वारे अधिसूचित करण्यात येतील अशा इतर क्षेत्रांमध्ये, या कलमान्वये परवानगी दिलेला असा विकास करण्यासाठी आवश्यक असेल अशा प्रमाणात, या अधिनियमाच्या प्रारंभापासून लागू होणार नाहीत.

(२) प्राधिकरण, कुंभमेळा निधीतून, जवळच्या प्रमुख रस्त्यापासून किंवा क्षेत्रापासून अशा नवीन नगरापर्यंत किंवा शहरापर्यंत रस्ते जोडणी आणि आवश्यक असलेल्या इतर पायाभूत सुविधा व सेवा पुरवण्यासाठी सक्षम असेल.

(३) अभिन्यास, निर्माण करावयाची शहरे किंवा नगरे यांसह कोणत्याही विकासासाठी परवानगी, अशा शर्तीवर देण्यात येईल की, त्यातील संरचनांचा व सुखसुविधांचा वापर, प्राधिकरणाद्वारे परवानगी देण्यात येईल केवळ अशा कालावधीकरिताच करता येईल, परंतु कोणत्याही बाबतीत, तो दोन वर्षांपेक्षा अधिक कालावधीसाठी करता येणार नाही, आणि रस्ते व भूमिगत उपयोगिता सुविधा या खेरीज सर्व संरचना, परवानगीचा उक्त कालावधी उलटल्यानंतर काढून टाकण्यात येतील.

(४) पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या परवानगीनुसार स्थापन केलेल्या नगरपालिकेच्या सीमेबाहेरील शहरांच्या किंवा वसाहतींच्या अशा अभिन्यासांमध्ये, आणि अशा अभिन्यासांमधील रस्ते, अतिक्रमणे, संरचना, फेरीवाले, स्वच्छता आणि अग्निशमन व आपत्कालीन परिस्थिती याबाबतीत, कुंभमेळा आयुक्ताला, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये महानगरपालिका सीमेच्या आत, महानगरपालिका आयुक्ताकडून जे अधिकार वापरण्यायोग्य आहेत असे सर्व अधिकार असतील.

१९४९ चा ५९.

कुंभमेळा निधी.

**१५.** (१) "कुंभमेळा निधी" म्हणून संबोधण्यात यावयाचा एक निधी घटित करण्यात येईल आणि त्यात पुढील रकमा जमा करण्यात येतील:-

(क) राज्य शासनाकडून किंवा केंद्र सरकारकडून मिळालेले कोणतेही अनुदान;

(ख) या अधिनियमान्वये प्राधिकरणाला मिळालेले कोणतेही शुल्क, आकार व अधिभार, इत्यादी;

(ग) कोणताही विश्वस्त निधी, मृत्युपत्रित दान, देणग्या, दाननिधी व इतर अनुदाने; आणि

(घ) प्राधिकरणाच्या वतीने मिळालेल्या इतर कोणत्याही रकमा.

(२) कुंभमेळा निधीचा वापर, कुंभमेळ्याचे व संलग्न उपक्रमांचे व्यवस्थापन व आयोजन करण्यासाठी आणि प्राधिकरणाकडून मान्यता देण्यात येतील अशा इतर कोणत्याही प्रयोजनांसाठी करण्यात येईल.

(३) राज्य शासन, सर्व विभाग , शासकीय कंपन्या आणि सांविधिक मंडळे किंवा महामंडळे, कुंभमेळ्याशी व संलग्न उपक्रमांशी प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे संबंधित असलेल्या प्रस्तावित व चालू असलेल्या बांधकामांसाठी, प्रकल्पांसाठी किंवा प्रापणांसाठी असलेला सर्व निधी व अनुदाने प्राधिकरणाकडे हस्तांतरित करील, जो या अधिनियमाच्या तरतुदींनुसार वितरित करण्यात येईल.

(४) कुंभमेळा निधी, अध्यक्षाच्या मान्यतेने कुंभमेळा आयुक्ताकडून वापरण्यात येईल.

आधिकार सोपविणे.

**१६.** प्राधिकरणास, किंवा यथास्थिति, अध्यक्षास, लिखित स्वरूपातील सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, या आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा शर्तींना, कोणत्याही असल्यास, अधीन राहून, त्यास आवश्यक वाटेल त्याप्रमाणे, या अधिनियमाखालील त्याचे असे अधिकार व कार्ये, राज्य शासनाच्या, स्थानिक प्राधिकरणाच्या किंवा शासकीय कंपनी, सांविधिक मंडळ किंवा महामंडळाच्या कोणत्याही अधिकाऱ्याला किंवा कर्मचाऱ्याला सोपविता येतील.

अडथळा आणणे, सहकार्य करण्यात किंवा निदेशांचे पालन करण्यात कसूर करणे, इत्यादींकरिता शास्ती.

**१७.** शासनाचे, स्थानिक प्राधिकरणाचे किंवा शासकीय कंपनी, सांविधिक मंडळ किंवा महामंडळ किंवा सार्वजनिक विश्वस्त संस्थेचे अधिकारी व कर्मचारी यांच्यासह, जो कोणी, कोणत्याही वैध व वाजवी कारणाशिवाय,-

(एक) या अधिनियमातून निर्माण झालेली कार्ये पार पाडताना, प्राधिकरणाने, अध्यक्षाने किंवा कुंभमेळा आयुक्ताने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला, कर्मचाऱ्याला किंवा व्यक्तीला अडथळा आणील किंवा सहकार्य करण्यात कसूर करील;

(दोन) या अधिनियमान्वये प्राधिकरणाने, अध्यक्षाने किंवा कुंभमेळा आयुक्ताने अथवा त्यांच्या वतीने दिलेल्या कोणत्याही निदेशांस अनुसरून कोणत्याही कार्यवाहीचे पालन करण्यास किंवा त्यासाठी सहकार्य करण्यास नकार देईल किंवा कसूर करील,

त्यास, दोषसिद्ध झाल्यावर, एक वर्षापर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा द्रव्यदंडाची अथवा दोन्ही शिक्षा होतील, आणि जर अशा अडथळ्यामुळे किंवा कसुरीमुळे किंवा नकारामुळे जीवितहानी, निकटवर्ती धोका किंवा गंभीर इजा झाली तर, त्यास, दोषसिद्ध झाल्यावर, दोन वर्षांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल.

कंपन्यांनी केलेले अपराध.

**१८.** (१) जेव्हा, या अधिनियमाखालील एखादा अपराध एखाद्या कंपनीकडून करण्यात आला असेल त्याबाबतीत, असा अपराध करण्यात आला त्या वेळी जी व्यक्ती कंपनीची प्रभारी होती आणि कंपनीचे कामकाज चालविण्यास कंपनीला जबाबदार होती अशी प्रत्येक व्यक्ती, तसेच कंपनीदेखील, अशा अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार, त्यांच्याविरुद्ध खटला दाखल केला जाण्यास आणि शिक्षा केली जाण्यास पात्र असेल :

परंतु, जर त्या व्यक्तीने, असा अपराध तिच्या नकळत घडला होता किंवा असा अपराध घडण्यास प्रतिबंध करण्यासाठी तिने सर्व वाजवी दक्षता घेतली होती असे शाबीत केले तर, या पोट-कलमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही गोष्टीमुळे अशी कोणतीही व्यक्ती, कोणत्याही शिक्षेस पात्र ठरणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा या अधिनियमाखालील अपराध, एखाद्या कंपनीकडून करण्यात आला असेल आणि तो अपराध, त्या कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी यांच्या संमतीने किंवा मूकसंमतीने करण्यात आला असेल अथवा त्यांनी केलेल्या निष्काळजीपणामुळे घडून आला असेल त्याबाबतीत, असे पदाधिकारीदेखील त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार, त्यांच्याविरुद्ध खटला दाखल केला जाण्यास आणि शिक्षा केली जाण्यास पात्र असतील.

**स्पष्टीकरण.** — या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) "कंपनी " याचा अर्थ, निगम निकाय असा असून त्यात, भागीदारी संस्थेचा किंवा व्यक्तींच्या संघाचा किंवा व्यक्तींच्या निकायांचा, मग ते विधिसंस्थापित केलेले असोत किंवा नसोत,- यांचा समावेश होतो; आणि

(ख) एखाद्या भागीदारी संस्थेच्या संबंधात, "संचालक" याचा अर्थ, भागीदारी संस्थेतील भागीदार, असा आहे, आणि व्यक्तींच्या कोणत्याही संघाच्या किंवा व्यक्तींच्या निकायाच्या संबंधात, संचालक याचा अर्थ, तिच्या कारभारावर नियंत्रण ठेवणारा कोणताही सदस्य, असा आहे.

अपराधांची दखल.

**१९.** कोणतेही न्यायालय, कुंभमेळा आयुक्ताने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने केलेल्या तक्रारीवरून असेल त्या खेरीज, या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाची दखल घेणार नाही.

न्यायालयाच्या अधिकारितेस रोध.

**२०.** कोणत्याही न्यायालयास, या अधिनियमाद्वारे किंवा त्या अन्वये प्रदान केलेल्या कोणत्याही अधिकारांना अनुसरून, प्राधिकरणाने, अध्यक्षाने व कुंभमेळा आयुक्ताने केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या, केलेल्या कोणत्याही कारवाईच्या, दिलेल्या आदेशांच्या, दिलेल्या निदेशांच्या किंवा सूचनांच्या बाबतीत, कोणताही वाद किंवा कार्यवाही दाखल करण्याची अधिकारिता असणार नाही.

अधिनियमाचा अधिभावी परिणाम असणे.

**२१.** या अधिनियमाच्या तरतुदी आणि त्या अन्वये काढलेले किंवा दिलेले कोणतेही आदेश हे, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अंमलात असतील.

नियम करण्याचा अधिकार.

**२२.** (१) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो केल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक अधिवेशनात मिळून, एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता सत्रासीन असताना, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने मांडण्यात आला असेल, ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, जर नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत होईल किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत होईल, आणि त्यांचा तशा अर्थाचा निर्णय, **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करतील तर, तो नियम, असा निर्णय, **शासकीय राजपत्रात**, प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून केवळ अशा फेरबदल

केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल, किंवा यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे त्या नियमान्वये यापूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

विनियम करण्याचा अधिकार.

**२३.** प्राधिकरणास, विनियमांद्वारे या अधिनियमान्वये तरतूद करावयाच्या सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी, या अधिनियमाच्या व त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींशी विसंगत नसतील असे विनियम, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने, वेळोवेळी, करता येतील.

निदेश देण्याचे अधिकार.

**२४.** राज्य शासनास, जनहितार्थ व या प्राधिकरणाच्या अधिक चांगल्या व प्रभावी प्रशासनासाठी, आवश्यक वाटतील असे निदेश, वेळोवेळी, प्राधिकरणास देता येतील; आणि प्राधिकरण, अशा निदेशांचे अनुपालन करील.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**२५.** ( १ ) जर या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरुप, उद्‌भवेल त्याप्रमाणे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट, **शासकीय राजपत्रात** प्रसिध्द केलेल्या आदेशाद्वारे करता येईलः

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

( २ ) पोट-कलम ( १ ) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडण्यात येईल.

सन २०२५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ याचे निरसन व व्यावृत्ती.

**२६.** ( १ ) नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण अध्यादेश, २०२५, हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

२०२५ चा महा. अध्या. ५.

( २ ) अशा प्रकारे निरसित झाले असले तरी, उक्त अध्यादेशान्वये केलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही ही ( काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश यासह ) या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींन्वये यथास्थिति करण्यात आलेली कृती किंवा कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

कुंभमेळा हा एक महत्वाचा धार्मिक मेळावा असून तो, महाराष्ट्र राज्यातील नाशिक विभागाच्या नाशिक व त्र्यंबकेश्वर तालुक्यांमध्ये आणि इतर क्षेत्रांमध्ये सुमारे दर बारा वर्षांमधून एकदा आयोजित केला जातो. साधू व महंत यांच्यासह विविध धार्मिक व सामाजिक संघटना तसेच राज्य शासनाचे सर्व विभाग यांच्या परस्पर सहकार्याने कुंभमेळा आयोजित केला जातो. कुंभमेळ्याचे संपूर्ण आयोजन, नियोजन व पर्यवेक्षण शासनाच्या निदेशाखाली उच्च प्राधिकाऱ्यांकडून केले जाते.

२. काळाच्या ओघात, कुंभमेळ्यास उपस्थित राहणाऱ्यांचे प्रमाण व संख्या यामध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. २०१५ या वर्षामध्ये, सुमारे दोन कोटी, पन्नास लाख भाविकांनी कुंभमेळ्यात सहभाग घेतला होता. आगामी कुंभमेळ्यास उपस्थित राहणाऱ्यांची संख्या वाढण्याची शक्यता असल्याने, व्यवस्थापनासमोर प्रचंड आव्हाने निर्माण होऊ शकतात. म्हणून, साधू, महंत, यात्रेकरू, पर्यटक व स्थानिक रहिवासी यांच्यासह सहभागी होणाऱ्या सर्वांना सुविधा पुरविण्याच्या आणि अध्यात्मिक व पर्यटनविषयक अनुभूतीची परिपूर्तता करणारे सुरक्षित, संरक्षित व दुर्घटनामुक्त वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीने, नाशिक विभागातील नाशिक व त्र्यंबकेश्वर तालुक्यांमध्ये आणि इतर क्षेत्रांमध्ये कुंभमेळ्याचे सुरळीत आयोजन व व्यवस्थापन करण्यासाठी शासनाच्या संबंधित विभागांच्या विवक्षित अधिकाऱ्यांचा समावेश असणारे प्राधिकरण स्थापन करण्याची आवश्यकता आहे असे वाटले.

३. कुंभमेळा आयोजित केल्या जाणाऱ्या उत्तर प्रदेश, उत्तराखंड व मध्यप्रदेश यांसारख्या इतर राज्यांनी, कुंभमेळ्याचे व्यवस्थापन व आयोजन करण्यासाठी विधिविधान अधिनियमित केले आहेत. त्याच धर्तीवर, नाशिक विभागाच्या नाशिक व त्र्यंबकेश्वर तालुक्यांमध्ये आणि इतर क्षेत्रांमध्ये कुंभमेळ्याचे व संलग्न उपक्रमांचे आयोजन व व्यवस्थापन करण्यासाठी कायदा अधिनियमित करणे इष्ट आहे, असे राज्य शासनास वाटले.

४. कायद्याची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेतः-

(एक) नाशिक- त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण स्थापन करणे, ते, नाशिक विभागातील नाशिक व त्र्यंबकेश्वर तालुक्यांमध्ये आणि इतर क्षेत्रांमध्ये कुंभमेळ्याचे व संलग्न उपक्रमांचे प्रभावीपणे आयोजन व व्यवस्थापन करण्यासाठी, एक निगम निकाय असेल;

(दोन) कुंभमेळ्याच्या व संलग्न उपक्रमांच्या व्यवस्थापनासाठी आवश्यक असलेली कामे, प्रकल्प, बांधकामे किंवा प्रापण यांचा अंतर्भाव असणारा कुंभमेळा आराखडा तयार करण्यासाठी प्राधिकरणाचे अधिकार व कार्ये यांकरिता तरतूद करणे ;

(तीन) कुंभमेळ्याचे आयोजन करण्यासाठी शासकीय विभाग व विविध प्राधिकरणांना निदेश देण्यासाठी, सुखसुविधा, इत्यादी पुरविण्याकरिता सेवा, सुविधा, संसाधने, जागा किंवा वाहने, इत्यादी अधिग्रहित करण्यासाठी प्राधिकरणाच्या अध्यक्षाचे अधिकार व कार्ये यांकरिता तरतूद करणे ;

(चार) प्राधिकरणाच्या कामाचा वेळोवेळी आढावा घेण्यासाठी मंत्री समिती घटित करणे ;

(पाच) आकस्मिक परिस्थितीत किंवा आपत्तीच्या बाबतीत, प्रापण, बांधकाम व लेखांकन करण्यासाठी आकस्मिक तरतूद करणे ;

(सहा) कुंभमेळा क्षेत्रात व्यवसाय किंवा व्यापार करण्यासाठी कोणत्याही व्यक्तीला किंवा कंपनीला परवानगी देण्यासाठी आणि नवीन तात्पुरत्या शहरांच्या किंवा नागरी वसाहतींच्या अभिन्यासाकरिता प्राधिकरणाला अधिकार देण्याकरिता तरतूद करणे.

५. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी नाशिक-त्र्यंबकेश्वर प्राधिकरण स्थापन करण्यासाठी कायदा करण्याकरीता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि, म्हणून, त्यांनी दिनांक ४ जून २०२५ रोजी नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण अध्यादेश, २०२५ (२०२५ चा महा. अध्या. ५), हा प्रख्यापित केला होता.

६. उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

**एकनाथ शिंदे,**

मुंबई,
दिनांक २४ जून, २०२५.

**उप मुख्यमंत्री**
(नगरविकास).

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन.

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेतः-

**खंड १ (२).–** या खंडान्वये, नाशिक विभागातील ज्या क्षेत्रात किंवा क्षेत्रांमध्ये कुंभमेळ्याशी संबंधित असणारे उपक्रम व संलग्न उपक्रम आयोजित केले जातात, ते क्षेत्र किंवा ती क्षेत्रे, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ३(१).–** या खंडान्वये, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, कुंभमेळा मंत्री समिती घटित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ४(१).–** या खंडान्वये, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नाशिक-त्र्यंबकेश्वर कुभमेळा प्राधिकरण स्थापन करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड २२ (१).–** या खंडान्वये, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी **शासकीय राजपत्रामध्ये** अधिसूचना काढून, नियम करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड २३.–** या खंडान्वये, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाशी व त्याखाली केलेल्या नियमांशी सुसंगत असलेले विनियम करण्याचा अधिकार, प्राधिकरणाकडे घेण्यात आला आहे.

**२५(१).–** या खंडान्वये, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, **शासकीय राजपत्रामध्ये** आदेश काढून, ती अडचण दूर करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे वर नमूद केलेले प्रस्ताव, सामान्य स्वरूपाचे आहेत.

(शा.म.मु.) एचबी ०६८७–४ (४४५–७-२०२५)

## वित्तीय ज्ञापन

या विधेयकाच्या खंड ९ च्या उप-खंड (२) मध्ये, प्राधिकरणाला, त्याचे दैनंदिन कार्यालय चालविण्यासाठी अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या कायमस्वरूपी व तात्पुरत्या पदांची निर्मिती करण्याची तरतूद केली आहे. खंड १५ मध्ये राज्य शासनाकडून कुंभमेळा निधीस मिळणाऱ्या अनुदानाची तरतूद केली आहे. हे विधेयक, राज्य विधानमंडळाचा अधिनियम म्हणून अधिनियमित झाल्यावर, कुंभमेळ्याच्या आयोजनासाठी व व्यवस्थापनासाठी राज्याच्या एकत्रित निधीतून तीन वर्षांच्या कालावधीसाठी करावयाच्या सध्याचा अंदाजित रुपये ४६९२ कोटी इतक्या आवर्ती खर्चाचा आणि रुपये ५८ कोटी इतक्या अनावर्ती खर्चाचा त्यात अंतर्भाव असेल.

## भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ अन्वये राज्यपालांची शिफारस

(महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग, आदेशाची प्रत)

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ याच्या खंड (३) अन्वये महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून, ते नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण विधेयक, २०२५ विचारात घेण्याबाबत राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांना शिफारस करीत आहेत.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६६. ]**

[ **नाशिक व त्र्यंबकेश्वर तालुक्यांमध्ये आणि नाशिक विभागातील इतर क्षेत्रांमध्ये दर बारा वर्षांच्या कालांतराने होणारा कुंभमेळा व संलग्न उपक्रमांचे आयोजन व व्यवस्थापन करण्यासाठी नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण स्थापन करण्याकरिता आणि तत्संबंधित व तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी विधेयक.**]

**[श्री. एकनाथ शिंदे,**
उप मुख्यमंत्री (नगरविकास).**]**

**(विधानसभेने दिनांक २ जुलै, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.